अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि.२८ जानेवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : ११९ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## ऑस्ट्रेलियन ओपन जिंकत रोहन बोपन्नाने रचला इतिहास

### वयाच्या ४३ व्या दुहेरी ग्रँड स्लॅमचा किताब पटकावला

**नवी दिल्ली :** भारताचा दिग्गज टेनिसपटू रोहन बोपन्नाने पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियन ओपनचा किताब जिंकलाय. बोपन्नाने शनिवारी (दि.२७) साथीदार मॅथ्यू एबडनसोबत ऑस्ट्रेलियन ओपन २०२४ च्या अंतिम फेरीत विजय मिळवला.

४३ वर्षीय बोपन्नाने मॅथ्यू एबडनच्या साथीने इटलीच्या सिमोन बोलेली आणि एंड्रिया वावस्सोरी यांना ७-६ आणि %-५ च्या फरकाने धूळ चारली. या विजयासह रोहन बोपन्नाने इतिहास रचलाय. हा बोपन्नाच्या कारकिर्दीतील पहिला दुहेरी ग्रँड स्लॅमचा किताब आहे. त्याने एकूण दोन ग्रँड स्लॅमच्या किताबावर नाव कोरले आहे.



यापूर्वी २०१७ मध्ये डॅब्रियला डाब्रोवस्कीच्या साथीने फ्रेंच ओपन मिश्रित दुहेरी ग्रँड स्लॅम जिंकला होता. रोहन बोपन्ना ग्रँड स्लॅम जिंकणारा सर्वात वयस्कर खेळाडू ठरलाय. सोबतच तो चॅम्पियन बनणारा वयस्कर खेळाडू आहे. त्याने जीन ज्युलियन रोजरचा विक्रम मोडित काढलाय. नेदरलँडच्या जीनने ४० वर्षे आणि ९ महिने एवढे वय असताना फ्रेंच ओपनचा दुहेरी किताब जिंकला होता. बोपन्नाने अंतिम फेरीत विजय मिळवल्यानंतर मॅथ्यू एडबनचे कौतुक केले आहे. तो ग्रँड स्लॅम जिंकणारा तिसरा भारतीय खेळाडू ठरला आहे.

# टिळा लावला, गदा फिरवली

- मराठा समाजातील जाणकारांची सावध भूमिका
- सग्यासोयऱ्यांमुळे उच्चपदस्थ चिंताग्रस्त

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन मागे घेतल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने सुस्कारा टाकला आहे. मागण्या मान्य झाल्याने जरांगेंनी मराठा बांधवांपुढे आडवी-तिडवी गदा फिरवली. महायुतीच्या मंत्र्यांनी विजयाचा गुलाल उधळला पण शनिवारी हाती आलेली माहिती धक्कादायक म्हणावी लागेल. शिंदे सरकारने मागण्यांबाबत घेतलेला निर्णय अजितदादा पवार यांच्या गटाला अमान्य झाला असून त्यातूनच त्यांच्यासह त्यांच्या मंत्र्यांनी विजयोत्सवाकडे पाठ फिरवली. सरकारच्या या निर्णयाने ओबीसी समाजात प्रचंड नाराजी पसरली आहे.जरांगेंना केवळ मुंबई न येवू देण्याच्या हेतून शिंदे यांनी नवी खेळी केल्याचा ओबीसी नेत्यांचा आरोप आहे तर सग्यासोयऱ्यांनाही आरक्षणाचा लाभ देण्याचा निर्णय कायद्याच्या कचाट्यात सापडू शकतो,असे विधी क्षेत्राचे म्हणणे आहे. मात्र हा निर्णय अत्यंत चांगला असून ओबीसींवर अन्याय केला जाणार नाही, असा दावा महायुतीच्या सरकारकडून केला गेलाय. शासन निर्णयांचा आणि अधिसूचनांचा अभ्यास केल्याशिवाय आनंदोत्सव करण न्यायाचे ठरणार नाही, अशी भूमिका कोल्हापूरमधील सकल मराठा समाजाने घेतली आहे. एकंदरीत हे चित्र पाहाता मराठा समाजाच्या हाती नेमके काय पडले? असा प्रश्न उपस्थित झाल्याने मराठा समाजातील जाणकरांनी यावर सावध भूमिका घेतली आहे. एकूणच मराठा आरक्षणाची दिशा कुठे जाणार? हा खरा प्रश्न आहे.

## नेमके हाती काय पडले?



### गाजर दाखवले...

राज्य सरकारने मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतून परत जावे म्हणून त्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. त्यासंदर्भातील आदेश काढण्यात आले आहेत. पण, हे ओबीसी कायद्याचे उल्लंघन आहे. संविधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीने कायद्याच्या चौकटीत राहून शब्द द्यायला हवा होता. अशाप्रकारे बेकायदेशीर बोलणे अयोग्य आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्याला वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी ओबीसीमधून पात्र ठरवता येणे शक्य नाही. त्यामुळे ही मराठा समाजाची फसवणूक आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा एकदा सरकारने मराठा समाजाला गाजर दाखवले आहे. हे आत्मघातकी ठरण्याची शक्यता आहे, असे राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाचे संयोजक नितीन चौधरी म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ज्यूस पिऊन जरांगे यांनी आपले आमरण उपोषण संपवले. जरांगे यांचे उपोषण मागे घेताना स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिंदे गटाचे मंत्री दीपक केसरकर आणि भाजपचे मंत्री गिरीश महाजन , मंगल प्रभात लोढा देखील हजर आहे. मात्र, याचवेळी अजित पवार गटाचे एकही मंत्री यावेळी उपस्थित नसल्याने चर्चेला उधाण आले आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे विरुद्ध अजित पवार असा संघर्ष पाहायला मिळाला होता. पहाटेपर्यंत चाललेल्या मनोज जरांगे आणि सरकारच्या शिष्टमंडळाच्या बैठकीनंतर मराठा आरक्षणाबाबत एकमत झाले. याबाबत सरकराने तातडीने जीआर देखील काढले आहेत. ५४ लाख नोंदी सापडलेल्या कुटुंबांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे ही पहिली मागणी होती. तर, कुणबी प्रमाणपत्र नोंद सापडणाऱ्या कुटुंबाला सरसकट आरक्षण द्यावे, अशी दुसरी मागणी होती. तसेच तिसरी मागणी होती ज्याची नोंद सापडली त्याच्या सग्यासोयऱ्यांनाही प्रमाणपत्र द्यावे अशा तीन मागण्या जरांगे पाटील यांच्या होत्या. या तीनही महत्वाच्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. त्यामुळे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत: राजपत्र घेऊन नवी मुंबईत मनोज जरांगे यांची भेट घेतली. सर्व मागण्या मान्य करुन, मुख्यमंत्र्यांनी जरांगे यांना गुलाल लावला.

**गुंता वाढणार : ॲड.निकम :** कायदे निकम यांनी मराठा आरक्षणाच्या आंदोलनानंतर आपली प्रतिक्रिया दिली. सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी सरकारने मान्य केलेली नाही. सगेसोयरे हा शब्द प्रयोग जात प्रमाणपत्र आणि पडताळणी विनियमन अधिनियमात समाविष्ट करण्यात येणार असला तरी त्यात प्रचलित पितृसत्ताक पद्धतीच्या नातेवाईकांचाच समावेश राहील. आर्थिक, दुर्बल हा निकष लावताना सगेसोयरे या शब्दाची सांगड लावायची असेल तर सगेसोयरे या शब्दाचा मराठीत अर्थ लावून जवळचे नातेवाईक म्हणजे कोण? हेही निश्चित करावे लागेल. तसेच सगेसोयरे म्हणजे मुलाकडील नातेवाईक की मुलीकडील नातेवाईक हे ठरवतानाही हा विषय वादाचा होऊ शकतो, अशी शक्यता उज्वल निकम यांनी व्यक्त केली.



**हाती नेमके काय पडले? :** ओबीसी अंतर्गत जात प्रमाणपत्र देण्यासाठी प्रचलित कार्यपद्धतीची नव्याने मांडणी करणारी प्रारूप अधिसूचना (अध्यादेश नव्हे) जारी करून जरांगे यांचे उपोषण आंदोलन संपविण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे यशस्वी ठरले आहेत.'सगेसोयरे' शब्द नव्याने समाविष्ट करण्यात आला असला तरी त्याच्या व्याख्येत पितृसत्ताक पद्धतीनेच नातेवाईक असलेल्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तर नातेवाईकांच्या जात दाखल्याच्या व शपथपत्राच्या आधारे अर्जदारास कुणबी दाखला मिळविण्यासाठी आधी गृहचौकशीही केली जाणार आहे. त्यामुळे मोठे आंदोलन करूनही मराठा समाजाच्या हाती प्रत्यक्षात किती व काय पडले आहे, याबाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

**उच्चपदस्थ काय म्हणतात :** काका, मामा, आत्या, मावशी आदी सगेसोयऱ्याकडे कुणबी प्रमाणपत्र असल्याचे त्याचे शपथपत्र हा पुरावा मानून अर्जदारास कुणबी प्रमाणपत्र देण्याची जरांगे यांची मागणी होती. पण सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी सरकारने मान्य केलेली नाही. सगेसोयरे हा शब्द प्रयोग जात प्रमाणपत्र आणि पडताळणी विनियमन अधिनियमात समाविष्ट करण्यात येणार असला तरी त्यात प्रचलित पितृसत्ताक पद्धतीच्या नातेवाईकांचाच समावेश राहील.



प्रजासत्ताक दिनी दानशूर भक्ताकडून

## विठ्ठल चरणी ५० लाखांचे सोन्याचे घोंगडे गुप्तदान

सुराज्य/सोलापूर

प्रजासत्ताक दिन. पंढरपुरातील विठ्ठल -रुक्मिणी मातेच्या चरणी दानशुर भाविकाकडून ५० लाख रुपये किंमतीच्या सोन्याच्या घोंगडीचे गुप्तदान केल्याची माहिती व्यवस्थाक बालाजी पुदलवाड यांनी दिली आहे.

दरम्यान, सदर सोने वस्तू ८२० ग्रॅमची असून, त्याची अंदाजे किंमत ४९.५७ लक्ष होत आहे. आज प्रजासत्ताक दिनानिमित्त पंढरपुरात विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली आहे. मंदिरातील गाभाऱ्याला व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. या सजावटीमुळे मंदिरातील रुप मनमोहक बनलं आहे. दर्शनासाठी राज्यभरातून लोक आले आहेत, भाविक दर्शनानंतर विठ्ठलाला वेगवेगळ्या पद्धतीने दान करतात. मात्र आज भाविकाने केलेल्या दानामुळे मंदिर परिसरात चर्चेचा विषय बनला आहे.

## हत्तुरे वस्ती परिसरात आत्महत्या

**सोलापूर :** होटगी रोड हत्तुरेवस्ती परिसरातील कामरान चौकाजवळ राहणाऱ्या एका ३२ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. नरेंद्र राजाराम माने (वय ३२ रा. कृष्णा कलेक्शन, हत्तुरेवस्ती) असे मयताचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी ६ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घरातील छताच्या वाशाला नायलॉन दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून हवालदार मणुरे पुढील तपास करीत आहेत.

## लालबावटा कार्यालयात कार्यकर्त्याची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर :** दत्तनगर परिसरातील माजी आमदार आडम मास्तर यांच्या लालबावटा कार्यालयात एका ७७ वर्षीय वृद्ध कार्यकर्त्यांने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना आज शनिवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली.

अल्लाउद्दीन अल्लाबक्ष शेख (वय ७७ रा. गांधीनगर झोपडपट्टी,अक्कलकोट रोड) असे मयताचे नाव आहे. आज दुपारी १२ वाजेच्या सुमारास त्यांनी दत्तनगर येथील आडम मास्तर यांच्या कार्यालयातील दुसऱ्या खोलीत असलेल्या छताच्या लाकडी वाशाला प्लास्टिकच्या पट्टीने गळफास घेतला होता. जेलरोडच्याच्या पोलिसांनी त्यांना फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र ते उपचारपूर्वी मयत झाले. मयत अल्लाउद्दीन शेख यांच्या पक्षात दोन पत्नी, तीन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे. ते पूर्वीपासून आडम मास्तर यांचे कार्यकर्ते होते. वृद्ध झाल्यामुळे आर्थिक मदत मिळावी म्हणून ते कार्यालयात नेहमीच होत होते. या घटनेची नोंद जेलरोड पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही. पुढील तपास हवालदार घुगे करीत आहेत.

## वाळूचा ढिगारा अंगावर पडून तरूणाचा मृत्यू

चिंचोली भोसेतील घटना

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर शहरालगत असणाऱ्या चिंचोली भोसे या गावात भीमा नदीपात्रामध्ये अवैध वाळू उपसा करण्यासाठी चौघेजण शनिवारी दि. २७ जानेवारी २०२४ रोजी पहाटे चार जण गेले होते. वाळू उपसा करत असताना अचानक वाळूचा ढिगारा पडल्यामुळे रामू अनिल धोत्रे याचा जागीच मृत्यू झाला आहे.

सदरच्या व्यक्तीला अवैध वाळू उपसा करण्यासाठी कोणी सांगितले त्याचा मास्टरमाईंड कोण हे पोलीस कारवाईतून निष्पन्न होईल परंतु सध्या तरी रामू याच्या मृत्यूबद्दल त्याच्या नातेवाईकांमधून शंका निर्माण होत आहे. अवैध उपसा करण्यासाठी गेलेल्या सर्वांच्या अंगावर ही वाळूची धडी पाडायला पाहिजे. एकट्या रामूच्या अंगावर कशी वाळूची धडी पडली तसेच वाळूची धडी पडल्यानंतर रामूचा मृत्यू झाला असल्याचे पाहून सुद्धा तेथून सोबत असणारे तिघेजण मृत्यूची खबर त्याच्या घरी व नातेवाईकांना न देता पळून गेले. त्यानंतर काही तासांनी त्यातील विकी आणि चिंट्या हे दोघेजण मिळून आले आहेत तर त्यातील एक जण चिम्या नावाच्या मुलगा मात्र स्वतःचा मोबाईल स्वीच ऑफ करून बेपत्ता आहे.



तसेच वाळूची धडी अंगावर कोसळल्यानंतर सोबत असणाऱ्या तिघांना वाळू बाजूला करून बाहेर काढणे सोपे असतानाही असे त्यांनी का केले नाही,अशी शंका निर्माण होत असून सध्या तरी शहरांमध्ये रामू धोत्रे यांच्या मृत्यूबद्दल वेगळीच चर्चा सुरू आहे. एकट्या रामूच्या अंगावर कशी वाळूची धडी पडली. सोबत असणारे तिघेजण मृत्यूची खबर त्याच्या घरी व नातेवाईकांना न देता पळून गेले. या घटनेची माहिती पोलिसांना माहिती मिळताच पोलीस घडलेल्या ठिकाणी तत्काळ दाखल झाले. पुढील कारवाई करण्याचे काम सुरू असल्याचे समजते. यातील मयत धोत्रे याचे एक महिन्यात पूर्वीच लग्न झाले होते पहाटे उठून तो अवैध वाळू उपसा करण्यासाठी घरातून गेला होता.

## पिंपळखुंटे येथे ट्रॅक्टरच्या अपघातात भावाचा मृत्यू

सोलापूर -स्वतःच्या द्राक्ष बागेत फवारणी करताना ट्रॅक्टरचा धक्का लागून सख्या भाऊ गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात पिंपळखुंटे (ता.माढा) येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडला. या प्रकरणात कुर्डूवाडीच्या पोलिसांनी मयताच्या भावाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

बाळू भगवान अनंतकळस (वय ३८ रा. कुर्डू ता.माढा) असे मयताचे नाव आहे. त्यांचा भाऊ रामचंद्र भगवान अनंतकवळस (रा.कुर्डू) याच्या विरुद्ध पोलिसांनी पुन्हा दाखल केला आहे. कुर्डू येथे राहणाऱ्या अनंतकळस यांची शेती पिंपळखुंटे येथे आहे. प्रजासत्ताक दिनाच्या ४ वाजेच्या सुमारास रामचंद्र आणि त्यांचा भाऊ बाळू हे दोघे ट्रॅक्टरद्वारे द्राक्ष पिकावर फवारणी करीत होते. त्यावेळी मयत बाळू अनंतकवळस हे ट्रॅक्टरच्या खाली राहून फवारणी करीत होते. उतारावरील ट्रॅक्टर तसेच पुढे गेल्याने त्यात बाळू अनंतकळस हे गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मयत झाले. पुढील तपास हवालदार गोरे करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



थंडीमध्ये खूप वर्षे वापरलाय हा मी, तू पण जपून ठेव !


कल्याण

237-20-145


## कुर्डूवाडीत लॉजवर पोलिसांची धाड, चालक-मालकावर गुन्हा

सुराज्य/कुर्डूवाडी

**कुर्डूवाडीतील जय महाराष्ट्र लॉजिंगमध्ये लॉजचा चालक हा वेश्याव्यवसायाकरीता बाहेरून महिला आणून त्यांना डांबून ठेऊन तसेच त्यांना पैशाचे आमिष दाखवत त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करुन घेत त्यांच्या येणाऱ्या कमाईवर स्वतः ची उपजिविका केल्याप्रकरणी मिळून लॉजच्या चालक व मालक या दोघांविरुद्ध कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.**

ही कारवाई दि.२६ जानेवारी रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास सोलापूर ग्रामीण अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष यांच्या पथकाने केली. यामुळे शहरात अवैधरित्या वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या लॉज चालकांचे धाबे दणाणले आहेत. लॉजचे चालक संदीप विलास पवार व लॉजचे मालक प्रकाश रामचंद्र गोरे (रा.कुर्डुवाडी) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गोपनीय बातमीदारामार्फत ग्रामीण पोलीस विभागातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक बजरंग साळुंके यांना कुर्डुवाडी येथे जयमहाराष्ट्र लॉजिंग येथे लॉजचे चालक संदीप पवार हे कुंटणखाना चालवीत असल्याची खात्रीलायक माहिती २६ जानेवारी सायंकाळी ६ वाजता समजली.

त्यानुसार त्यांनी एक बनावट ग्राहक, एक पंच यासह पोलिसांचे पथक तयार करुन सदर लॉजवर छापा टाकण्याचे नियोजन करुन खासगी वाहनातून पोलीस सूर्यकांत जाधव,लक्ष्मण राठोड,सविता कोकणे आदींसह बनावट ग्राहक हे छाप्याच्या ठिकाणी पोहचले तर सरकारी वाहनाने साळुंके, उपनिरीक्षक मोतीराम मोरे, प्रणोती यादव, सचिन वाकडे,




शिपाई प्रीती पाटील,चालक रामनाथ बोंबिलवार यांच्यासह दोन पंच सदर ठिकाणी पोहचले. त्यानंतर बनावट ग्राहक लॉजमध्ये पाठवले. ठरल्याप्रमाणे थोड्याचवेळात सदर बनावट ग्राहकाचा मिसकॉल फिर्यादी यांना आला. त्यानुसार सदर लॉजवर छापा टाकला असता काऊंटरवरील इसमाची विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव संदीप विलास पवार लॉजचा चालक असल्याचे सांगितले. त्यानंतर पथकाने लॉजच्या चालकासमक्ष तळघरातील खोली नं १०२ चा दरवाजा ठोठावला असता बनावट ग्राहक व बेडवर पश्चिम बंगाल येथील महिला बसल्याचे दिसून आले. त्याचबरोबर १०१ नंबरच्या रुमचा दरवाजा ठोठावला असता तिथेही एक महिला असल्याचे आढळून आले.

याबाबत पोलिसांनी त्यांच्याकडे विचारपूस केली असता ती हडपसर येथील असल्याचे सांगितले .त्यानंतर झाडाझडती घेतली असता त्यांच्याकडे ४१ हजार ५०० रु किमतीचे मोबाईल व इतर साहित्य आढळून आले. यामध्ये पोलिसांनी बनावट ग्राहकाकडे दिलेल्या ५०० रूपयांच्या तीन नोटा या लॉजच्या चालकाकडे अंगझडतीत मिळून आल्या. पो.स.ई प्रणोती यादव अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष सोलापूर यांच्या फिर्यादीवरुन कुर्डूवाडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

## दोन गटात तलवार, लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर :** पूर्वीच्या भांडणावरून दोन गटात तलवार, लोखंडी रॉड, काठी आणि दगडाने झालेल्या मारहाणीत दोन्ही गटातील ५ जण जखमी झाले. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास नांदणी (ता. दक्षिण सोलापूर) येथील गणेश धाब्याजवळ घडली.

राम शिवशरण (वय ३१) आणि त्याचा भाऊ श्याम शिवशरण (वय ३८ दोघे रा.नांदणी) असे पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. नांदणी येथील गणेश धाब्याजवळ त्यांना पूर्वीच्या वैमनस्यातून गणेश वाघमारे आणि इतर ६ जणांनी मिळून तलवार आणि रॉडने मारहाण केली. असे अशी नोंद पोलिसात झाली. तर दुसऱ्या गटातील प्रकाश बलभीम वाघमारे (वय ३५), महेश बाबुराव सुरवसे (वय २४) आणि श्रीकृष्ण गणपती काळे (सर्व रा. नांदणी) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना त्याच कारणावरून राम शिवशरण त्याचा भाऊ श्याम शिवशरण आणि अन्य दोघांनी मिळून मारहाण केली.